# निविदा सूचना व सर्व साधारण अटी व शर्ती

| सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, धुळे विभाग, धुळे | | | | |
|---|---|---|---|---|
| अं. क्र. | पदाचे नाव | भरावयाचे पदसंख्या | पदाचे स्वरूप | शैक्षणिक अर्हता |
| १ | शिपाई | ४ | कंत्राटी स्वरुपात (११ महिने करार तत्वावर) पूर्णवेळ अकुशल पद | १२ वी उत्तीर्ण, पदविधर, अंशकालीन असल्यास प्राधान्य, टंकलेखन व संगणक ज्ञान असल्यास प्राधान्य. |
| २ | पहारेकरी | १ | कंत्राटी स्वरुपात (११ महिने करार तत्वावर) पूर्णवेळ अकुशल पद | १२ वी उत्तीर्ण, शारीरिक दृष्टया सक्षम व अंशकालीन असल्यास प्राधान्य. |

वरील विषयाच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे निविदा प्रक्रियेच्या अटी व शर्ती ठरविण्यात आलेल्या आहेत.

**<u>निविदे सोबतच्या तांत्रिक व कायदेशीर अटी व शर्ती पुढील प्रमाणे :-</u>**

## भाग :- अ

## निविदा पद्धत :-

**निविदा दोन लिफाफा पद्धतीने स्वीकारली जाईल.**

**लिफाफा क्रमांक :- 1 (तांत्रिक लिफाफा) :-**

या मध्ये " **शिपाई** (बहुउददेशीय **गट-ड कर्मचारी) पदासाठी मनुष्यबळ पुरवठा करण्याकरिता निविदा" व " पहारेकरी** (बहुउददेशीय **गट-ड कर्मचारी) पदासाठी मनुष्यबळ पुरवठा करण्याकरिता निविदा"** तांत्रिक पात्रतेसाठी आवश्यक कागदपत्रे असे नमुद करुन मोहोर बंद लिफाफा सादर करावा.

**लिफाफा क्रमांक :- 2 (आर्थिक लिफाफा) :-**

या मध्ये फक्त दर पत्रक असेल व सदरचे दरपत्रकामध्ये प्रति कर्मचारी आकारावयाचे **शुल्क (दरमहा) सर्व वजावटी व करांसहीत** दाखल करणे अनिवार्य राहील.

हे दोन्ही लिफाफे स्वतंत्र करून मोहोर बंद लिफाफ्यात सादर करावेत, ज्यावर **"शिपाई (बहुउद्येशिय गट- ड कर्मचारी) पदासाठी मनुष्यबळ पुरवठा करण्याकरिता निविदा" व "पहारेकरी (बहुउद्येशिय गट- ड कर्मचारी) पदासाठी मनुष्यबळ पुरवठा करण्याकरिता निविदा" असे स्पष्टपणे नमूद करावे.**

**बयाणा रक्कम (EMD) :-**

निविदाकाराने निविदे सोबत रुपये 5,000/- (रुपये पाच हजार फक्त) इतक्या रकमेची बयाणा रक्कम राष्ट्रीयकृत बँकेच्या डिमांड ड्राफ्ट (DD) किंवा पे-ऑर्डरद्वारे " सहायक धर्मदाय आयुक्त, धुळे " यांच्या नावे सादर करणे बंधन कारक आहे. बयाणा रक्कमेचा ड्राफ्ट (DD) किंवा पे-ऑर्डर विना प्राप्त निविदा विचारात घेतली जाणार नाही. अयशस्वी निविदाकारांना बयाणा रक्कमेचा ड्राफ्ट (DD) किंवा पे-ऑर्डर परत केली जाईल.

**सुरक्षा ठेव (Security Deposit) :-**

यशस्वी निविदाधारकास कार्यादेश मिळाल्यानंतर 7 दिवसांच्या आत एकूण वार्षिक कराराच्या 3% रकमेची सुरक्षाठेव कार्यालयाकडे जमा करावी लागेल. ही रक्कम कंत्राट कालावधी यशस्वीरीत्या पूर्ण झाल्यानंतर परत केली जाईल.

**कंत्राट कालावधी :-**

सदर कंत्राट सुरुवातीला 11 महिन्यांच्या कालावधीसाठी असेल. संस्थेचे काम समाधानकारक असल्यास आणि कार्यालयाची आवश्यकता असल्यास, दोन्ही पक्षांच्या संमतीने तीन दिवसांचा खंड कालावधी देवून पुढील 11 महिन्यांच्या कालावधीसाठी त्याच संस्थेला कंत्राट दिले जावू शकते. तसेच संबंधित संस्थेचे कामकाज असमाधानकारक असल्यास कोणत्याही वेळी 1 महिन्याचे पूर्व नोटीस देवून कंत्राट समाप्त करण्यात येईल.

**समितीचे अधिकार :-**

कोणताही एक किंवा सर्व निविदा फेटाळण्याचा अथवा संपूर्ण निविदा प्रक्रिया रद्द करण्याचा अधिकार सहयक धर्मदाय आयुक्त, धुळे यांचे अध्यक्षतेखाली गठीत समिती कडे राखून ठेवला आहे.

**वाद निवारण :-**

निविदे संदर्भात कोणताही वाद निर्माण झाल्यास, तो धुळे न्यायालयाच्या कार्यक्षेत्राच्या अधीन राहील.

## भाग :- ब

## तांत्रिक पात्रता

**(लिफाफा क्रमांक 1 मध्ये सादर करावयाची कागदपत्रे)**

**(खालील सर्व कागदपत्रांच्या स्वयं - साक्षांकित (Self-attested) प्रती सादर करणे बंधनकारक आहे)**

**1. संस्थेची नोंदणी :-**

कंत्राटदार /ठेकेदार /कंपनी /संस्थाही कंपनीकायदा /सहकारी संस्था नोंदणी अधिनियम /भागीदारी कायदा किंवा शॉप ॲक्ट अंतर्गत नोंदणीकृत असल्याचा पुरावा.

**2. मनुष्यबळ पुरवठ्याचा अनुभव :-**

मनुष्यबळ पुरवठा करण्याचा किमान २ वर्षांचा अनुभव असल्याचा पुरावा. शासकीय /निमशासकीय कार्यालयांना सेवापुरवल्या असल्यास, संबंधित कार्यादेशाच्याप्रती जोडाव्यात.

**3. आर्थिक स्थिती :-**

मागील 3 वर्षांचे आयकर विवरणपत्र (ITR) भरल्याच्या पावत्या आणि वार्षिक उलाढालीचा (Turnover) तपशील.

**कायदेशीर नोंदणी :-**

4. वस्तू व सेवाकर (GST) नोंदणी प्रमाणपत्राची प्रत.

5. भविष्य निर्वाह निधी (EPF) नोंदणी प्रमाणपत्राची प्रत.

6. राज्य कामगार विमा (ESIC) नोंदणी प्रमाणपत्राची प्रत.

7. व्यवसाय कर (PTEC/PTRC) नोंदणी प्रमाणपत्राची प्रत.

8. पॅनकार्ड संस्थेच्या / कंपनीच्या पॅनकार्डची प्रत.

**9. हमीपत्र (Undertaking) :-**

कंत्राटदार /ठेकेदार /कंपनी /संस्थायांना कोणत्याही शासकीय /निमशासकीय कार्यालयाने काळ्यायादीत (Blacklist) टाकलेले नाही किंवा संस्थेविरुद्ध कोणताही फौजदारी गुन्हा दाखल नाही, अशा आशयाचे 100 रुपयांच्या स्टॅम्प पेपर वरील हमीपत्र.

**10. बयाणा रकमेचा पुरावा :-**

बयाणा रकमेचा मूळ डिमांड ड्राफ्ट / पे-ऑर्डर.

## भाग :- क

## -: सर्व साधारण अटी व शर्ती :-

१. शिपाई / पहारेकरी (बहुउददेशीय गट-ड कर्मचारी) निविदेचे सिलबंद लिफाफे या कार्यालयाच्या आवज / जावक शाखेकडे कार्यालयीन वेळेत निविदा प्रक्रीया कार्यक्रमात नमुद तारखे पर्यंत स्विकारले जातील. अंतिम दिनांक १५/०९/२०२५ रोजी सायंकाळी ०५.०० पर्यंत निविदा आवक / जावक विभागात स्विकारल्या जातील. कोणत्याही परिस्थितीमध्ये विहीत तारीख व वेळेनंतर आलेल्या निविदांचा स्वीकार केला जाणार नाही.

२. कंत्राटी सेवकाचे **अ) शिपाई** (बहुउददेशीय गट-ड कर्मचारी) या पदाकरिता 12 वी उत्तीर्ण, पदविधर, अंशकालीन असल्यास प्राधान्य, टंकलेखन व संगणक ज्ञान असल्यास प्राधान्य, **ब) पहारेकरी** (बहुउददेशीय गट-ड कर्मचारी) या पदाकरिता 12 वी उत्तीर्ण, शारीरिक दृष्टया सक्षम व अंशकालीन असल्यास प्राधान्य या पदाकरिता 12 वी उत्तीर्ण किंवा पदवीधर, अंशकालीन असल्यास प्राधान्य याप्रमाणे निकष राहील.

३. पुरविण्यात येणारा शिपाई व पहारेकरी (बहुउददेशीय गट-ड कर्मचारी) शारीरिक दृष्ट्या सक्षम, निरोगी आणि चांगल्या वर्तणुकीचा असावा. त्याचे वय 18 ते 45 वर्षां दरम्यान असावे.

४. व्यसनाधीन, गुन्हेगारी पार्श्वभूमी असणाऱ्या सेवकास नियुक्ती देता येणार नाही. त्याबाबतीत नियुक्त कर्मचाऱ्याची पोलीस चारित्र्य पडताळणी (Police Verification) करून त्याचा अहवाल संबंधित कंत्राटदार /ठेकेदार / कंपनी / संस्था यांनी कार्यालयास सादर करणे बंधनकारक असेल.

५. कंत्राटदार /ठेकेदार /कंपनी /संस्था यांचेतर्फे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या सेवेचे कोणतेही उत्तरदायित्व या कार्यालयावर राहणार नाही.

६. नियुक्त कर्मचारी हा संस्थेचा / एजन्सीचा कर्मचारी असेल. त्याचे कार्यालयाशी मालक - सेवक असे नाते राहणार नाही व तो शासनाच्या सेवेत सामावून घेण्यासाठी पात्र राहणार नाही.

७. कर्मचाऱ्याचे वेतन, भविष्य निर्वाह निधी (PF), राज्य कामगार विमा (ESIC), बोनस आणि इतर सर्व वैधानिक देणी वेळेवर अदा करण्याची संपूर्ण जबाबदारी संस्थेची असेल.

८. प्रत्येक महिन्याचे वेतन पुढील महिन्याच्या 7 तारखेपर्यंत कर्मचाऱ्याच्या बँक खात्यात जमा करणे आणि त्याची पावती (उदा. PF/ESIC चलन) कार्यालयास सादर करणे बंधनकारक असेल. बिल सादर करताना या पावत्या जोडणे आवश्यक आहे.

९. संस्थेने कर्मचाऱ्याला ओळखपत्र व गणवेश (Uniform) पुरवणे बंधनकारक आहे.

१०. कर्मचारी रजेवर किंवा गैरहजर असल्यास, संस्थेने तात्काळ पर्यायी व्यवस्था करावी, अन्यथा दंडात्मक कारवाई केली जाईल.

११. बेशिस्त वर्तन करणाऱ्या कर्मच्याऱ्यास या कार्यालयाने निर्देशित केल्यावर त्वरित काढून टाकावे लागेल व पर्यायी व्यवस्था करावी लागेल. कुठल्याही परिस्थितीत पर्यांयी व्यवस्था न केल्यास संबंधित कंत्राटदार /ठेकेदार /कंपनी /संस्थायांना प्रती दिवशी मनुष्याबळाचे प्रतिदिन वेतन याप्रमाणे दंडात्मक कारवाई केली जाईल व सदरचा दंड अनामत रकमे मधून वसुल केला जाईल.

१२. उपरोक्त पदाच्या सेवेसाठी प्रत्येक माणसा करिता आकारण्यात आलेला दर हा किमान वेतन कायदा 1948 प्रमाणे असावा.

१३. शिपाई (बहुददेशीय गट-ड कर्मचारी) यांना शासन निर्णय क्रमांक-सीएचए-२०२३/ प्र.क्र.३८/का.1 दिनांक ०९/०३/२०२३ मधील परिशिष्ठ -क नमुद बहुददेशीय गट-ड कर्मचारी संवर्गामध्ये नमुद केलेल्या कोणत्याही संवर्गाचे काम करणे बंधनकारक राहील.

१४. नियुक्त केलेल्या व्यक्तीला आठवडयातून एक दिवस साप्ताहीक अवकाश राहील आणि वेतनामध्ये साप्ताहीक अवकाशाचा समावेश राहिल तसेच एका दिवशी एका पेक्षा अधिक सेवकांना साप्ताहित सुटी देय राहणार नाही.

१५. कंत्राटी सेवकास अपघात झाल्यास खर्चाची पुर्तता करण्याची जबाबदारी या कार्यालयाची राहणार नाही.

१६. कार्यालयाच्या मालमत्तेचे कर्मचाऱ्याकडून कोणतेही नुकसान झाल्यास, त्याची भरपाई

करण्याची जबाबदारी कंत्राटदार संस्थेची असेल.

१७. कार्यालयाने निश्चित केलेल्या कार्यालयीन शिस्तीचे व नियमांचे पालन करणे कर्मचाऱ्यास बंधनकारक राहील.

१८. बाह्ययंत्रणेद्वारे मनुष्यबळ नेमावयाच्या निविदा प्रक्रीयेला प्रशासकीय व वित्तीय मान्यता प्राप्त झाल्यावर कंत्राटदारास लेखी करार करावा लागेल.

१९. सदरची निविदा प्रक्रीया राबवित असताना आवश्यकता असल्यास वेळोवेळी अटी व शर्ती मधील बदल करणे बाबत किंवा निविदा प्रक्रीया रदद करणे बाबत शुध्दीपत्रक किंवा सूचना ही निविदा दाखल करणाऱ्यांवर बंधनकारक राहील. असे शुध्दीपत्रक किंवा सूचना ही कार्यालयाच्या नोटीसबोर्डवर प्रकाशीत /प्रसिदध करण्यत येईल.

२०. करार संपुष्टात आणायचा असल्यास, दोन्ही पक्षांना एक महिन्याची लेखी नोटीस देणे बंधनकारक असेल.

२१. संस्थेमार्फत कार्यालयास पुरविण्यात येणाऱ्या कर्मचाऱ्यास या कार्यालयातील सेवेच्या आधारावर शासकिय सेवेत दाखल होण्याकरीता न्यायालयात दावा करण्याचा हक्क राहणार नाही.

२२. सदरील निविदा सूचना (http://charity.maharashtra.gov.in) संकेतस्थळा वर प्रसिद्ध करण्यात आली आहे.

वरील प्रमाणे निविदा प्रक्रिया कार्यक्रम ठरविणेबाबत व निविदा सूचना निर्गमित करणे तसेच निविदा प्रक्रियेच्या अटी व शर्ती ठरविण्याबाबत विचार विनिमय करण्यात आला आहे. वरील सर्व बाबींना समितीने एकमताने मंजुरी दिलेली असून ठराव संमत करण्यात आलेला आहे.

| | |
|---|---|
| स्वा/- | स्वा/- |
| (रा.शं.कानडे) | (रा.दि.पाटील) |
| अध्यक्ष तथा | सचिव, तथा अधीक्षक, (आस्था) |
| सहायक धर्मादाय आयुक्त, धुळे | धुळे |

| | | | |
|---|---|---|---|
| स्वा/- | स्वा/- | स्वा/- | स्वा/- |
| (शि.ना.दुतोंडे) | (ग.गो.आवटे) | (ध.श्रा.इगवे) | (सु.गो.गांगुर्डे) |
| सदस्य, तथा अधीक्षक, | सदस्य, निरीक्षक | सदस्य, निरीक्षक | सदस्य, निरीक्षक |
| धुळे | धुळे | धुळे | धुळे |

-७-

निविदा प्रक्रीया कार्यक्रम

| अ. क्र. | तपशील | दिनांक | शेरा |
|---|---|---|---|
| 1 | जाहीर निविदा सूचना काढणे | 21/08/2025 | |
| 2 | जाहीर नोटीस प्रसिद्ध करणे (कार्यालयीन नोटीस बोर्ड, जिल्हा माहिती कार्यालय, जिल्हा न्यायालय, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, धुळे) | 01/09/2025 | |
| 3 | मा. धर्मादाय आयुक्त यांचे संकेत स्थळावर (http://charity.maharashtra.gov.in ) प्रसिद्ध करणे | 01/09/2025 | |
| 4 | निविदा स्विकारणे, कालावधी ( शासकिय सुटीचे दिवस वगळून) | 01/09/2025 ते 15/09/2025 रोजी सायं. 5.00 वाजेपर्यंत | |
| 5 | निविदा उघडण्याची तारीख किंवा निविदा मुदतवाढ आवश्यक असल्यास पुढील प्रक्रीया निश्चित करणे. | 16/09/2025 | |
| 6 | निविदा मुदतवाढ नसल्यास समितीच्या संमतीनुसार तुलनात्मक तक्ता तयार करणे | 16/09/2025 | |
| 7 | मा. स.ध.आ. धुळे यांच्या मान्यते नंतर मा. धर्मादाय सह आयुक्त नाशिक यांच्याकडे समितीचा अहवाल सादर करणे. | 17/09/2025 | |
| 8 | मा. धर्मादाय आयुक्त महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे मार्फत शासनास प्रशासकीय व वित्तीय मान्यते करीता प्रस्ताव सादर करणे | मा.ध.स.आ. नाशिक यांच्या मंजुरी नंतर | |

स्वा/-
(रा.शं.कानडे)
अध्यक्ष तथा
सहायक धर्मादाय आयुक्त, धुळे

स्वा/-
(रा.दि.पाटील)
सचिव, तथा अधीक्षक, (आस्था)
धुळे

स्वा/-
(शि.ना.दुतोंडे)
सदस्य, तथा अधीक्षक,
धुळे

स्वा/-
(ग.गो.आवटे)
सदस्य, निरीक्षक
धुळे

स्वा/-
(ध.श्रा.इगवे)
सदस्य, निरीक्षक
धुळे

स्वा/-
(सु.गो.गांगुर्डे)
सदस्य, निरीक्षक
धुळे